महाराष्ट्र शासन
टोल फ्री क्र. १८०० २६७ ०००७

# महाराष्ट्र शासन
# आदिवासी विकास आयुक्तालय
# महाराष्ट्र राज्य, नाशिक
आदिवासी विकास भवन, १ ला मजला, गडकरी चौक,
जुना आग्रा रोड, नाशिक-४२२००२

Email admntd.nsk-mh@gov.in

जा.क्र.प्रशा-२०२४/प्र.क्र.५९/का.२(२)/ दिनांक : ०१ आक्टोंबर, २०२४

## आदिवासी विकास विभाग भरती -२०२३
## जाहीर प्रगटन

आदिवासी विकास विभागा मार्फत जाहीर प्रगटन करण्यात येते की, आयुक्त, आदिवासी विकास महाराष्ट्र राज्य नाशिक यांचे स्तरावरुन दिनांक २३.११.२०२३ रोजी आदिवासी विकास विभागामधील ६०२ विविध रिक्त पदांकरिता जाहीरात प्रसिध्द करण्यात आली होती. व त्यानुससार दिनांक २३.११.२०२३ ते १३.१२.२०२३ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात आलेले होते. सदर विविध पदांकरीता उमेदवारांची ऑनलाईन पध्दतीने अर्ज प्राप्त झालेले आहेत.

तथापि, सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६, दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ अन्वये सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग(एसईबीसी) (Socially and Educationally Backward Classes) (SEBC) या संवर्गाचा समावेश करुन व त्यानुसार पुनश्च बिंदूनामावली अद्ययावत करुन गट-क संवर्गासाठी पुनश्च जाहीरात प्रसिध्द करण्याबाबत शासन स्तरावरुन सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे दिनांक २३.११.२०२३ रोजी विभागामार्फत प्रसिध्द केलेल्या जाहीरातीमध्ये विविध संवर्गाच्या पदामध्ये सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासवर्ग(एसईबीसी) (Socially and Educationally Backward Classes) (SEBC) या सवर्गाचा नव्याने समावेश झाल्याने जुन्या जाहीरातीत जी पदे दर्शविलेली होती, त्यात नविन अधिसुचनेच्या अनुषंगाने पदे कमी जास्त झालेली आहेत. तसेच अपर आयुक्त नागपुर यांनी बिगर पेसा संवर्गगातील जुन्या जाहीरातीतील शिक्षक व आदिवासी विकास निरीक्षक या सवंर्गाची एकुण पदे १११ दर्शविलेली होती परतु पेसा व बिगर पेसा क्षेत्रातील बिंदु निमावली मागास वर्गीय कक्षाकडुन तपासण्यात आलेली नाही त्यामुळे १११ पदे वगळण्यात आलेली आहे, व दिनांक २३.११.२०२३ रोजी प्रसिध्द केलेली जाहीरात रद्य करण्यात आलेली आहे.ज्या उमेदवारांनी दिनांक २३.११.२०२३ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहीरातीनुसार अर्ज केलेले आहेत. त्यांचे अर्जाचे शुल्क विभागाने परत करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार अशा उमेदवारांनी **https://tribal.maharashtra.gov.in** संकेतस्थळावर उपलब्ध लींकवर आपली माहीती भरावी, जेणे करुन उमेदवारांचे शुल्क त्यांना परत करता येईल.सदर लींक वर दिनांक ०५.१०.२०२४ ते दिनांक २८.१०.२०२४ पर्यंत उमेदवारांनी त्यांची माहीती भरणे बंधनकारक राहील. भरतीबाबत नविन जाहीरात स्वतंत्रपणे प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांना याबाबत काही अडचन असल्यास टोल फ्री क्रमांक१८०० २६७ ०००७ यावर संपर्क साधावा.

**नयना गुंडे (भाप्रसे)**
**आयुक्त, आदिवासी विकास**
**महाराष्ट्र राज्य नाशिक**

**आदिवासी विकास विभाग भरती २०२३ जाहिरात रद्द केल्याने शुल्क परत मिळवण्यासाठी खालील लिंक ओपन करावी.**

https://ibpsonline.ibps.in/tdcnjun23